# महाराष्ट्र राज्याकरिता

## नियंत्रण कालावधी जुलै २०२० ते जून २०२३

## ठोक जलप्रशुल्क प्रस्तावाचा मसुदा.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

जानेवारी २०२२.

# नियंत्रण कालावधी जुलै २०२० ते जून २०२३  ठोक जलप्रशुल्क प्रस्तावाचा मसुदा

**१.० पार्श्वभूमी :-**

**१.१ महाराष्ट्र राज्य जलनिती २०१९ दि. ५ सप्टेंबर, २०१९ परिच्छेद १७ नुसार खालीलप्रमाणे तरतूद आहे.**

*पाणीवापराचे विनियमन करण्यामध्ये आणि पाणीवापर कार्यक्षमतेची सुनिश्चिती करण्यामध्ये पाणी शुल्क महत्त्वाची भूमिका बजावते.  राज्याने या पूर्वीच प्रशुल्क (टॅरिफ) ठरविण्याची जबाबदारी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणावर सोपवलेली आहे.*

प्रशुल्क संरचना निश्चित करताना प्राधिकरण पुढील मार्गदर्शक तत्त्वे विचारात घेईल :

१) प्राधिकरण पारदर्शक व सहभागी पध्दतीने काम करेल.  प्रशुल्क ठरविण्यापूर्वी जनतेशी सल्लामसलत करील व त्यांचे मत ऐकून घेईल.

२) प्राधिकरण सुरुवातीस जल पायाभूत सुविधांवरील मानक आधारित किमान आवर्ती खर्च तसेच त्यानंतर टप्प्याटप्प्याने खर्च प्रतिबिंबित होणारा पाण्याचा दर वसूल होईल याची खात्री करेल.

३) आवर्ती खर्चात, योजनेच्या प्रणालीतील चिरंतन लाभ मिळण्याचे सुनिश्चिती , पाण्याचा कार्यक्षम वापर, पाणीवापरकर्त्यांना हक्काचे पाणी मिळण्यासाठी आवश्यक प्रणालीची उपलब्धता आणि पाण्याची समन्यायी वाटप यासाठी आवश्यक, वीजखर्चासह कार्यान्वयन व परिरक्षण खर्च, सुटे भाग, व्ययशील बाबी, आस्थापना प्रशासकीय खर्च, वरकड खर्च तसेच पायाभूत सुविधा घटकांच्या पुन:स्थापना खर्चासह (उदा. नियंत्रक दरवाजे इत्यादी) विशेष दुरुस्तीच्या (सरंचना पुन:स्थापनेचा व पुनर्जोडणीचा) खर्चाचा समावेश असेल.

४) समन्यायी, कार्यक्षमता व आर्थिक तत्त्वे यांचे पालन करण्याच्या दृष्टीने एक नियम म्हणून पाण्याचा आकार घनमापनतत्त्वावर निर्धारित करण्यात येईल.

५) पाण्याचा दर त्याच्या काटेकोर वापर करण्यास प्रोत्साहन देईल आणि त्याचे संधारण करण्यास पुरस्कृत करेल.

६) योग्यरित्या नियोजन केलेल्या प्रशुल्क रचनेद्वारे विशिष्ट मानकापर्यंत पाण्यावर प्रक्रिया केल्यानंतर पुन:चक्रीत ( Recycle ) वापर व पुन:वापर करण्यास प्रोत्साहन दिले जाईल.

७) विविध पाणीवापर प्रवर्गातील क्रॉस सबसिडी टप्प्याटप्प्याने काढून टाकण्यात येईल.

**१.२** महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम , २००५ कलम ११ (घ ) मध्ये सिंचन व्यवस्थापनाच्या प्रशासकीय कार्यचालन व परिरक्षणाच्या संपूर्ण खर्चाची वसुली परावर्तीत होईल अशा तऱ्हेने पाण्याची ( जलप्रशुल्क ) पद्धती ठरविणे व पाणीपट्टी आकारण्याचे निकष महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणने ठरविणे व त्यानुसार पाणीपट्टी दर निश्चिंत करण्याची तरतूद आहे.

**१.३** अधिनियमातील तरतुदीनुसार मजनिप्राने प्रथम सन २०१० ते २०१३ या कालावधीसाठी जलप्रशुल्काचे निकष ठरवून दिले. त्यानुसार शासन निर्णय २०१०/(४०७/१०)/सिंव्य (धोरण) , दि. २९/०६/२०११ अन्वये सन २०१० ते २०१३ साठी जलप्रशुल्क निर्धारित करण्यात आले होते. सन २०१३ ते २०१६ या कालावधीसाठीचे जल प्रशुल्क प्रशासकीय कारणांस्तव जानेवारी २०१८ पर्यंत सुधारित होऊ शकले नाहीत. त्यामुळे सन २०१० ते २०१३ या कालावधीसाठी निश्चिंत केलेल्या जलप्रशुल्कास शासनाने वेळोवेळी मुदतवाढी दिल्या. त्यानंतर प्राधिकरणाने दि. ११ जानेवारी २०१८ च्या आदेशानुसार सन २०१७ ते २०२० या नियंत्रण कालावधीकरिता जलप्रशुल्क निर्धारित केले.

**१.४** सदर नियंत्रण कालावधी संपल्यानंतर काही तांत्रिक मुद्द्यामुळे शासनाकडून आधारभूत माहिती व दरप्रस्ताव प्राप्त होण्यास वेळ लागल्याने तसेच पँडेमिक कोविड १९ च्या प्रतिबंधामुळे प्रतिकूल परिणाम झाल्याने या दरादेशास शा.नि.क्र. बिसिआ- २०१९ / प्र . क्र. १५३/ सिंव्य (धोरण), ३१/०७/२०२० , १९/०१/२०२१ , २९/०७/२०२१ व ३०/१२/२०२१ नुसार वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली. ही मुदत वाढ शासनाने आधारभूत तपशीलांसह दरप्रस्ताव प्राधिकरणास सादर करावा तसेच प्राधिकरणाने सुधारित ठोक जलप्रशुल्कनिश्चित केल्यानंतर सदर दर ०१/०७/२०२० पासून लागू होतील या अटींसह देण्यात आली.

**१.५** जानेवारी २०१८ मध्ये दुसरे जलप्रशुल्क आदेश निर्गमित केल्यानंतर, प्राधिकरणाने पूर्वानुभवाच्या आधारे राजपत्रातील भाग ४(क) दि. २४/०५/२०१९ रोजीच्या स्वतंत्र अधिसूचनेद्वारे सदर जलप्रशुल्क निर्धारणाचे विनियम निरसित करण्यात आले. प्राधिकरणाने, ठोक जलप्रशुल्क निर्धारणाची पारदर्शक व सातत्यपूर्ण कार्यपद्धत निश्चित करण्याच्या उद्देशाने व तिचे नियतकालिक पुनर्विलोकन व पुनरिक्षण करण्यासाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (ठोक जलप्रशुल्क निर्धारणाकरिता निकषांचे निश्चितीकरण व आदेश काढणे) मार्गदर्शक सूचना, २०१९ दि. १४/११/२०१९ रोजी अधिसूचित केल्या. या दरम्यान प्राधिकरणाने सन २०२०-२३ करीता ठोक जलप्रशुल्क निर्धारणासाठीचा दृष्टीनिबंध ( Approach Paper ) ऑक्टोबर २०१९ मध्ये केला.त्याच्या मराठी व इंग्रजी दोन्ही प्रती संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**१.६** शासनाकडून ऑक्टोबर २०२१ मध्ये दरप्रस्ताव व आधारभूत सामुग्री प्राप्त झाल्यानंतर त्याची छाननी करून प्राधिकरणाने सदर मार्गदर्शक सूचना २०१९ च्या परिच्छेद ३ नुसार ठोक जलप्रशुल्क निर्धारणाचे निकष (२०२०-२३) चा मसुदा तयार केला आणि दृष्टीनिबंध ( ऑक्टोबर २०१९) च्या परिच्छेद २ नुसार तो तज्ञ् समूहाच्या सल्लामसलतीकरिता निवडलेल्या तज्ञांना उपलब्ध करून

देण्यात आला . त्यांचेकडून प्राप्त अभिप्राय व सूचना विचारात घेऊन सुधारित केलेला निकषाचा मसुदा या जलप्रशुल्क प्रस्तावाच्या मसुद्यासोबत लाभार्त्यांसमवेत सल्लामसलतीकरिता स्वतंत्रपणे उपलब्ध करण्यात येत आहे.

**१.७** शासनाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार बिगर सिंचन वापराप्रमाणेच सिंचनासाठीही घनमापन पद्धतीने पाणीपुरवठा व आकारणी करण्याच्या धोरणाशी सुसंगत असा हा दरप्रस्ताव घनमापन पद्धतीवर आधारित आहे. यासाठी शासनाने पाणी मोजमाप यंत्रे सिंचन क्षेत्रात कालबद्ध कार्यक्रमानुसार लवकरात लवकर बसविणे अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे निर्मित सिंचन क्षमते पैकी उर्वरित क्षेत्रामध्ये पाणीवापर संस्था स्थापनेचा कालबद्ध कार्यक्रमही राबविण्याचे शासनाचे धोरण आहे.

**२.०० प्रशुल्क दराचा कालावधी :-**

या प्रस्तावातील जल प्रशुल्क दि. ०१/०७/२०२० ते ३०/०६/२०२३ या तीन वर्षाच्या नियंत्रण कालावधीसाठी आणि त्यानंतर प्राधिकरण निर्धारित करील त्या वाढीव कालावधीसाठी वैध राहतील. प्राधिकरण, निकषांच्या कोणत्याही पुनर्विलोकन व पुनर्निरीक्षणासाठी मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद केलेली कार्यपद्धती अवलंबेल.

**३.०० मजनिप्राच्या निकषानुसार सन २०२० ते २०२३ या कालावधीचे जल प्रशुल्क ठरविण्यासाठी विचारात घेतलेली आधारसामुग्री.**

३.१ सन २०१६-१७ ते २०१९-२० या कालावधीमधील वर्षवार निर्मित सिंचन क्षमता, सिंचनीय लाभक्षेत्र, प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र व विना सिंचित क्षेत्र खालील तक्ता १ नुसार आहे.

**तक्ता.१**

**निर्मित सिंचन क्षमता व प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र (क्षेत्र- लक्ष हेक्टर मध्ये)**

| सन | निर्मित सिंचन क्षमता (समुच्चयित) | सिंचित लाभक्षेत्र (समुच्चयित) |
|---|---|---|
| २०१६-२०१७ | ४९.६५ | ४०.५६ |
| २०१७-२०१८ | ५०.३६ | ३९.४३ |
| २०१८-२०१९ | ५१.२३ | ३५.९७ |
| २०१९-२०२० | ५३.०४ | ४०.९७ |

आधार - (सिंचन स्थिती दर्शक अहवाल प्रपत्र ५ व प्रपत्र १८ नुसार)

३.१.१ सन २०२० ते २०२३ मधील अपेक्षित सिंचित क्षेत्र:-

तक्ता- १ नुसार राज्यातील निर्मित सिंचन क्षमता व प्रत्यक्ष सिंचित क्षेत्रात सध्या १२.०० लक्ष हेक्टर म्हणजे ( २२.६४ %) तफावत आहे. कालव्याची दुरुस्ती, बंदीस्त नलिकेद्वारे पाणी पुरवठा, सुक्ष्म सिंचन, अस्तरीकरण याचा वापर करुन सदर तफावत दूर करण्याचे शासनाचे नियोजन आहे.

**३.२** कृषी, घरगुती व औद्योगिक कारणांसाठी सन २०१६-१७ ते २०१९-२० या कालावधीमध्ये वर्षवार झालेला पाणीवापर (दलघमी) खालील तक्ता २ नुसार आहे.

**तक्ता.२**

**कृषी, घरगुती व औद्योगिक कारणासाठीचा पाणीवापर- दलघमी**

| सन | कृषी | घरगुती | औद्योगिक | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| २०१६-१७ | १९९२९.५५ | ४६८८.७८ | ६७२.०९ | २३६९.३३ | २७६५९.७५ |
| २०१७-१८ | १८५७३.२६ | ४९२९.४५ | ७५५.१० | १६३१.५६ | २५८८९.३७ |
| २०१८-१९ | १६१६१.५१ | ५२३४.८५ | ७७४.६४ | १५२७.३१ | २३६९८.३१ |
| २०१९-२० | १८७६४.७२ | ४६३९.०६ | ८४७.०० | २२९४.२२ | २६५४४.८० |

आधार - (सिंचन स्थिती दर्शक अहवाल प्रपत्र ३९ नुसार)

**३.३** सन २०१६-१७ ते २०१८-१९ मधील वर्षनिहाय घरगुती पाणी वापराची ग्रामपंचायती, नागरी स्थानिक सस्था व म.न.पा यांची सरासरी टक्केवारी खालील तक्ता ३ नुसार आहे.

**तक्ता.३**

**ग्रामपंचायती, नागरी स्थानिक संस्था व महानगरपालिकाचा सरासरी पाणी वापर (टक्केवारी)**

| सन | उपवर्गवारी | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण/ग्रामपंचायत | नागरी स्थानिक संस्था | महानगरपालिका | | |
| | | | घरगुती | वाणिज्यिक | |
| **२०१६-१७** | २४.७१ | १०.५५ | ६०.५७ | ४.१७ | १०० |
| **२०१७-१८** | २३.९१ | ११.७८ | ६०.७४ | ३.८४ | १०० |
| **२०१८-१९** | ३१.१६ | १३.११ | ५२.३७ | ३.३६ | १०० |
| **सरासरी** | २६.५९ | ११.८१ | ५७.८० | ३.७९ | १०० |

**३.४** औद्योगिक पाणी वापरापैकी कच्चा माल म्हणून पाणी वापर व प्रक्रियेसाठीचा पाणी वापर अशी विगतवारी खालील तक्त्यानुसार आहे.

**तक्ता.४**

**औद्योगिक पाणी वापरापैकी कच्चामाल, प्रक्रिया व घरगुती पाणी वापर (टक्केवारी)**

| सन | उपवर्गवारी | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | कच्चा माल म्हणून पाणीवापर | प्रक्रियाकरणासाठी वापर | घरगुती | |
| **२०१६-१७** | १.६८ | ७९.८३ | १८.४८ | १०० |
| **२०१७-१८** | ०.९४ | ८३.४२ | १५.६५ | १०० |
| **२०१८-१९** | १.३६ | ८४.६४ | १४.०० | १०० |
| **सरासरी** | १.४० | ८२.७० | १६.१० | १०० |

**३.५** सन २०१६-१७ ते २०१९-२० मधील प्रकल्पांची सिंचन व बिगर सिंचनाची पाणीपट्टी आकारणी, वसुली ताळेबंद **तक्ता. ५** अ व तक्ता. **५** ब नुसार आहे.

तक्ता. ५ अ

सिंचन पाणीपट्टी आकारणी व वसुली (रु.कोटी)

| अ.क्र. | सन | सिंचन | | |
|---|---|---|---|---|
| | | चालु आकारणी | वसुली (स्थानिक उपकरासह) | |
| | | | वसुली | टक्केवारी % |
| १ | २ | ३ | ४ | ५= (४/३*१००) |
| १ | २०१६-१७ | ७३.०५ | ५९.४८ | ८१.४२ |
| २ | २०१७-१८ | ९३.७२ | ७४.३० | ७९.२८ |
| ३ | २०१८-१९ | १०५.७९ | ७८.२७ | ७४.०० |
| ४ | २०१९-२० | ११४.०४ | ५५.९६ | ४९.०७ |

आधार - (सिंचन स्थिती दर्शक अहवाल प्रपत्र ३४ नुसार)

तक्ता ५ ब

बिगरसिंचन पाणीपट्टी आकारणी व वसुली (रु.कोटी)

| अ.क्र. | सन | बिगरसिंचन | | |
|---|---|---|---|---|
| | | चालु आकारणी | वसुली (स्थानिक उपकरासह) | |
| | | | वसुली | टक्केवारी % |
| १ | २ | ३ | ४ | ५= (४/३*१००) |
| १ | २०१६-१७ | ६९०.४७० | ५१३.४३ | ७४.३६ |
| २ | २०१७-१८ | ७३५.०६० | ६१३.८४ | ८३.५१ |
| ३ | २०१८-१९ | १०३०.९५० | ९६५.८७ | ९३.७० |
| ४ | २०१९-२० | ११९५.६८० | ९०८.३४ | ७५.९७ |

आधार - (सिंचन स्थिती दर्शक अहवाल प्रपत्र ३४ नुसार)

**३.६ प्रचालन व परिरक्षण खर्च:-** मजनिप्रा अधिनियम कलम ११ (घ) नुसार सिंचन व्यवस्थापनाच्या प्रशासकीय कार्यचालन व परिरक्षणाच्या संपूर्ण खर्चाची वसूली परावर्तीत होईल अशा तऱ्हेने पाणीपट्टी दर निश्चित करण्याची तरतुद आहे. मजनिप्रा यांनी दि.१४/११/२०१९ रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार "स्विकृत प्रचालन व परिरक्षण खर्च" मध्ये केलेल्या व्याख्येनुसार विविध बाबीवरील खर्च खालील तक्त्यात नमुद करण्यात आला आहे.

तक्ता.६

## प्रचालन व परिरक्षण खर्च (रू.कोटी)

| अ. क्र. | मजनिप्रा मार्गदर्शक सूचना , २०१९ मधील अ.क्र.२ क्र. | | खर्चाचा प्रकार | सन २०२०-२१ साठी प्राधिकरणाने प्रस्तावित केलेल्या वाजवी खर्चाची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | १५ | प्रशासकीय खर्च | सिंचन व्यवस्थापनाच्या विभागीय कार्यालय व मंडळ कार्यालयाच्या कर्मचा-यांचि संभाव्य आकृतिबंधानुसार संख्या २९६० आहे. सन २०२०-२१ साठी सातव्या वेतन आयोगानुसार वेतन व भत्ते यासाठीचा खर्च समावेश करण्यात आला आहे | **११६** |
| २ | १६ | सिंचन व्यवस्थापन खर्च | यामध्ये सिंचन व्यवस्थापनाच्या उपविभागीय कार्यालय व शाखा कार्यालयाच्या कर्मचा-यांचे सन २०२०-२१ साठी सातव्या वेतन आयोगानुसार वेतन व भत्ते यासाठीचा खर्च व पाणीपाळीच्या वेळी नेमलेल्या कर्मचा-यांवर झालेला खर्च, कार्यालयीन खर्च, लेखन साहित्य खर्च, जाहिरात खर्च, वाहनांवरील खर्च, संकिर्ण साहित्य खरेदी, पाणीवापर संस्था स्थापनेवरील खर्च, पिक मोजणी, पाणीपट्टी आकारणी व वसुली इत्यादी बांबीवरील केलेला खर्च याचा समावेश करण्यात आला आहे. | **८५०** |
| ३ | १७ + १९ | परिरक्षण खर्च + परिचालन खर्च | कार्यचालन परिरक्षण व परिचालन परिरक्षण खर्चामध्ये पंपाद्वारे धरणाच्या गॅलरीमधील झिरप्याचे पाणी काढणे, कालव्यातील गाळ, गवत, रानटी झुडपे काढून कालव्याची वहनक्षमता पुर्ववत करणे, कालव्याचे फुटलेले भाग पुर्ववत करणे, पाण्याची गळती टाळण्यासाठी कालव्यावरील बांधकामाची दुरुस्ती करणे, खराब झालेले रबर सील व स्टेम रॉड बदलणे, प्रचलन करणा-या कर्मचा-यांच्या निवासी व अनिवासी इमारतींचा दुरुस्ती खर्च व अन्य तत्सम बाबींवर होणा-या खर्चाचा समावेश आहे. | **५००** |
| ४ | १८ | कार्यान्वयन खर्च | यामध्ये उपसा सिंचन योजनेवरील विद्युत आकार, सुटे भाग, वापरांती संपुष्टात येणा-या बाबी व यासारख्या अन्य बाबींचा समावेश आहे. | **२५४** |
| ५ | २० | प्रतिबंधात्मक खर्च | यामध्ये उपसा सिंचन योजना आणि कालव्यावरील नियंत्रण बांधकामे यांच्या विद्युत व यांत्रिकी चल भागांना वंगन करणे, पाण्याचे गळती मार्गवर उपाययोजना करणे, पाण्याचे गळतीमार्ग तयार झाल्याने भराव फुटण्याचा धोका टाळण्यासाठी भरावामधुन होणारी गळती रोखणे सांडव्याच्या पुच्छ मार्गातील गळती बंद करणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे, दगडी बांधकामातील खराब झालेला भाग (पॉईंटीग) पुर्ववत करणे ई. बाबीचा समावेश आहे. | **२००** |
| | | | **एकुण प्रचालन व परिरक्षण खर्च** | **१९२०** |

**३.७** मागील पंधरा वर्षाच्या सरासरीवरून अंदाजित उपलब्ध होणारा पाणीसाठा , खरिपातून होणारा वापर आणि बाष्पीभवन व्यय विचारात घेता वापरासाठी एकूण उपलब्ध पाणी व प्रवर्गनिहाय अंदाजित वापर तक्ता क्र. ७ -अ मध्ये दिला आहे. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने प्रस्तावित केलेल्या निकषानुसार कृषी, घरगुती व औद्योगिक साठीच्या वापरातून अपेक्षित पाणीपट्टी खालील तक्ता क्र. ७ -ब नुसार आहे.

तक्ता क्र. ७ - **अ**

ठोक जलदर २०२०-२३ करिता जलसंपदा प्रकल्पातून उपलब्ध पाण्याचा प्रवर्गनिहाय वापर

| अ. क्र. | बाब | पाण्याचे परिमाण ( दलघमी ) | संदर्भ |
|---|---|---|---|
| १ | स्थापित साठवणूक क्षमता (१५/१०/२०१९ नुसार) | ४३८३७ | सिस्थिअ २०१९-२०,प्रपत्र ३९ |
| २ | १५ ऑक्टोबरचा अंदाजित साठा | ३०६८६ | साठवणूक क्षमतेच्या ७० % ( मागील १५ वर्षाची सरासरी ७० % ) सिस्थिअ २००५-०६ ते २०१९-२०,प्रपत्र ३९ |
| ३ | अंदाजित बाष्पीभवन व्यय | ४६१३ | मागील १५ वर्षाची सरासरी सिस्थिअ २००५-०६ ते २०१९-२०,प्रपत्र ४० |
| ४ | १५ ऑक्टोबर रोजी वापरासाठी उपलब्ध निव्वळ साठा ( २-३) | २६०७३ | |
| ५ | खरिपासाठी अंदाजित वापर | ६२८३ | मागील १५ वर्षाची सरासरी सिस्थिअ २००५-०६ ते २०१९-२०,प्रपत्र ४० |
| ६ | एकूण वार्षिक वापर (२ +५ ) | ३६९६९ | मागील १५ वर्षाची सरासरी सिस्थिअ २००५-०६ ते २०१९-२० |
| ७ | प्रवर्गनिहाय वार्षिक पाणीवापर | | |
| | ७.१ ) घरगुती पाणीवापर | ६७६० | मागील ५ वर्षाची सरासरी सिस्थिअ २०१५-१६ ते २०१९-२० |
| | ७.२) औदयोगिक पाणीवापर | ८४७ | सिस्थिअ २०१९-२०,प्रपत्र ३९ ( मागील चार वर्षातील सर्वाधिक ) |
| | ७.३) बाष्पीभवन व्यय | ४६१३ | मागील १५ वर्षाची सरासरी सिस्थिअ २००५-०६ ते २०१९-२०,प्रपत्र ४० |
| | ७.४) कृषी वापरास उपलब्ध पाणी [६-(७.१+७.२+७.३)] | २४७४९ | एकूण वार्षिक वापरातून इतर प्रवर्गाचा वापर वजा जाता शिल्लक |
| | एकूण | ३६९६९ | |

तक्ता क्र. ७ -ब

सन २०२०-२१ साठी कृषी,घरगुती व औद्योगिक साठी अंदाजित केलेला पाणीवापर गृहित धरुन उपरोक्त प्रस्तावित प्रचालन व परिरक्षण खर्चाची विभागणी प्रस्तावित मसुदा निकषानुसार दिलेल्या टक्केवारीने करून येणारा सरासरी प्रवर्ग निहाय दर खालील तक्त्यात दिला आहे.

| अ. क्र. | प्रवर्ग | प्रत्यक्ष पाणीवापर (दलघमी) तक्ता क्र.२ नुसार | अपेक्षित पाणीवापर (दलघमी) | सन २०२०-२१ साठी अपेक्षित प्रचालन व परिरक्षण खर्च(रु.कोटी) | सन २०२०-२३ साठी जनिप्रा निकषा नुसार हिस्सा(%) | प्रवर्गाकडून अपेक्षित पाणीपट्टी (रु.कोटी) | सरासरी दर (रु./घमी) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | कृषी | सिंचन स्थिती दर्शक अहवाल सन २००५-०६ ते २०१९-२० मधील प्रपत्र ३९ नुसार | २४७४९.०० | १९२० | १९ | ३६५ | ०.१५ |
| २ | घरगुती | सिंचन स्थिती दर्शक अहवाल सन २०१५-१६ ते २०१९-२० मधील प्रपत्र ३९ नुसार | ६७६०.०० | | २२ | ४२२ | ०.६२ |
| ३ | औद्योगिक | सिंचन स्थिती दर्शक अहवाल सन २०१९-२० मधील प्रपत्र ३९ नुसार | ८४७.०० | | ५९ | ११३३ | १३.३७ |
| एकूण | | | ३२३५६ | | १०० | १९२० | |

वरील तक्त्यातील सरासरी दर हा फक्त स्त्रोतनिहाय व प्रवर्गनिहाय उपवर्गवारीनुसार पाणीवापराचे प्रमाण पाहून , त्या त्या प्रवर्गाचा अपेक्षित खर्चाचा वाटा वसूल होण्याकरिता मूळ दर परिगणित करण्यासाठी मार्गदर्शक म्हणून उपयुक्त आहेत. प्रत्यक्ष प्रस्तावित दर अर्थातच भिन्न आहे. मुख्य तीन प्रवर्गाच्या उपप्रवर्गातील दरांचे आणि स्त्रोतनिहाय दरांचे प्रमाण ज्यावर आधारित आहे अशा मूळ दराची , सरासरी दर ही सर्वोच्च मर्यादा आहे. मूळ दर निश्चित करताना उपप्रवर्गनिहाय व स्त्रोतनिहाय पाणीवापराचे प्रमाण व प्रवर्गनिहाय निकषानुसारची वसुली योग्य पाणीपट्टी याचा ताळमेळ घालावा लागतो.

## ४.०० कृषी च्या पाणीपुरवठयासाठी जल प्रशुल्क:-

सन २०२० ते २०२३ या कालवधीमधील कृषीसाठी होणारा एकूण अपेक्षित पाणीवापर परिच्छेद ३.७० नुसार २४७४९.०० दलघमी असून त्याद्वारे तक्ता ७ नुसार अपेक्षित पाणी पट्टी रक्कम रू.३६५ कोटी आहे. त्यानुसार कृषीसाठी पाणी वापर संस्थांकरिता पाणी वापराचा सरासरी दर १५ पैसे/घमी (१५ पैसे प्रती १००० लिटर) आहे. मसुदा निकषानुसार पाणी वापर संस्था स्थापन करण्यास प्रोत्साहन अंदाजित देण्यासाठी वैयक्तिक लाभधारकांना मुळ दर १.२५ पट जास्त प्रस्तावित केला आहे.

वैयक्तिक लाभधारकांचा पाणीवापर सुमारे ६० % असून उन्हाळी वापरास - जो वैयक्तिक पाणी वापर संस्था मिळून ७६ % पैकी ५८.२६ % आहे. निकषानुसार दीडपट (१.५ पट) दर लागू आहे. या दोन्ही बाबींचा विचार करून पाणी वापर संस्थाकरिता मूळ दर ( रब्बी हंगामासाठी ) ११ पैसे / घमी (११ पैसे प्रती १००० लिटर) तर वैयक्तिक लाभधारकांसाठी १४ पैसे / घमी (१४ पैसे प्रती १००० लिटर) प्रस्तावित करण्यात येत आहे. कृषीसाठी होणारा पाणी पुरवठा हा कालव्याद्वारे प्रवाही पध्दतीने व उपसा पध्दतीने केला जातो.उपसा पध्दतीने होणारा पाणीवापर जलाशय, कालवा व नदीच्या स्त्रोतामधुन केला जातो. या दोन्ही पध्दतीने सन २०२० ते २०२३ या कालावधीमध्ये विविध स्त्रोतामधून होणारा एकूण अपेक्षित पाणीवापर व अपेक्षित पाणीपट्टी खालील तक्ता ८ नुसार आहे.

<u>तक्ता ८</u>

**सन २०२० ते २०२३ या कालावधीमध्ये होणारा स्त्रोतनिहाय कृषीसाठी होणारा**

| अ. क्र. | स्त्रोत | एकूण कृषी वापराशी % | एकूण अपेक्षित पाणी वापर (दलघमी) | एकूण अपेक्षित पाणीपट्टी रक्कम (रु.कोटी) |
|---|---|---|---|---|
| १ | कालव्याद्वारे प्रवाही पध्दीतीने पाणी पुरवठा | ७६ | १८८१०.०० | ३६५ - ४८.२६ =३१६.७४ (शासकीय उपसा सिंचन योजना (उसियो) यांसाठीचा खर्च ४८.२६) |
| २ | उपसा द्वारे पाणीपुरवठा | २४ | ५९३९.०० | |
| | **एकूण** | १०० | **२४७४९.००** | |

## अपेक्षित पाणी वापर व अपेक्षित पाणीपट्टी

कालव्याद्वारे प्रवाही पध्दतीने पाणी वापर संस्था वैयक्तीक लाभधारक आणि उपसा द्वारे जलाशय, कालवे व नदीतून होणारा पाणी वापर खालील तक्ता ९ नुसार अपेक्षित आहे.

<u>तक्ता ९</u>

**प्रवाही पध्दतीने व खाजगी उपसा** योजनाद्वारे **होणारा अपेक्षित पाणीवापर(दलघमी)**

| अ.क्र. | पाणी पुरवठा पध्दत | अपेक्षित पाणीवापर | एकूण कृषी वापराशी % |
|---|---|---|---|
| १ | कालव्याद्वारे प्रवाही पध्दतीने | | |
| | अ) पाणी वापर संस्था | ४२९९.०० | १७.३७ |
| | ब) वैयक्तीक लाभधारक | १४५११.०० | ५८.२६ |
| | **एकूण (अ+ब)** | **१८८१०.००** | **७६** |
| २ | उपसा योजनाद्वारे | | |
| | क) जलाशयामधून होणारा पाणी वापर | १९००.०० | ७.८० |
| | ड) धरणाच्या खालील बाजूची नदी,कालवे व को.प.बंधाऱ्यामध्ये धरणातून नियंत्रित पाणी सोडून होणारा पाणीवापर | ३३३०.०० | १३.६५ |
| | इ) कोणत्याही जलाशयातून पाणी न सोडता केवळ नैसर्गिक प्रवाहातून होणारा पाणीवापर | ६५०.०० | २.६८ |
| | ई) संस्थेचा खाजगी जलाशयातून किंवा जलाशयाचा प्रमाणशीर खर्च संस्थेने सोसला असल्यास अशा जलाशयातून होणारा पाणी पुरवठा | ५९.०० | ०.२४ |
| | **एकूण (क+ड+इ+ई)** | **५९३९.००** | **२४** |
| **एकूण (१+२)** | | **२४७४९.००** | **१००** |

**तक्ता १०**

**प्रवाही सिंचनाकरिता पाण्याचे घनमापन दर (पैसे/घमी)** ( पैसे प्रती १००० लिटर)

| अ.क्र. | हंगाम | नोंदणीकृत पाणीवापर संस्था | | वैयक्तिक लाभधारकांकरीता | |
|---|---|---|---|---|---|
| | | सन २०२०-२१ साठी सरासरी दर | प्रस्तावित दर (सन २०२०-२१) | सन २०२०-२१ साठी सरासरी दर | प्रस्तावित दर (सन २०२०-२१) |
| १ | खरीप | ११.०० | ५.५० | १४.०० | ७.०० |
| २ | रब्बी | | ११.०० | | १४.०० |
| ३ | उन्हाळी | | १६.५० | | २१.०० |

सन २०२० ते २०२३ या कालावधीसाठी पाणीपुरवठा प्रकार व स्त्रोतनिहाय कृषीसाठी पाणी वापराचे दर खालील तक्ता ११ (प्रवाही सिंचन) व १२ (उपसा सिंचन) नुसार प्रस्तावित करण्यात येत आहेत.

**तक्ता ११**

**सन २०२० ते २०२३ या कालवधीसाठी पाणी पुरवठा प्रकार व स्त्रोत निहाय प्रवाही सिंचनाचे प्रस्तावित दर (पैसे/घमी) ( पैसे प्रती १००० लिटर)**

| अ. क्र. | पाणीपुरवठा प्रकार | प्रस्तावित दर (पैसे/घमी) ( पैसे प्रती १००० लिटर) | | | अपेक्षित पाणी वापर परिमाण (दलघमी) | | | अपेक्षित पाणीपट्टी (रू. कोटी) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | खरिप | रब्बी | उन्हाळी | खरिप (२२%) | रब्बी (४७%) | उन्हाळी (३१%) | खरिप | रब्बी | उन्हाळी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | (अ) पाणी वापर संस्था | ५.५० | ११.०० | १६.५० | ९४५.७८ | २०२०.५३ | १३३२.६९ | ५.२० | २२.२३ | २१.९९ |
| २ | (ब) वैयक्तीक लाभधारक | ७.०० | १४.०० | २१.०० | ३१९२.४२ | ६८२०.१७ | ४४९८.४१ | २२.३५ | ९५.४८ | ९४.४७ |
| **एकुण अपेक्षित पाणीपट्टी** | | | | | | | | **२७.५५** | **११७.७१** | **११६.४६** |
| | | | | | | | | **२६१.७१** | | |

<u>तक्ता १२</u>

**सन २०२० ते २०२३ या कालवधीसाठी पाणी पुरवठा प्रकार व स्त्रोत निहाय खाजगी उपसा सिंचनाचे वैयक्तिक लाभधारकांसाठी प्रस्तावित दर ( पैसे/घमी) ( पैसे प्रती १००० लिटर)**

( निकषानुसार प्रवाहीच्या ६५% )

| अ.क्र. | पाणीपुरवठा प्रकार व स्त्रोत | सरासरी दर | प्रस्तावित दर | | | अपेक्षित पाणी वापर परिमाण (दलघमी) | | | अपेक्षित पाणीपट्टी (रू. कोटी) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ख | र | उ | ख (२२%) | र (४७%) | उ (३१%) | ख | र | उ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | आश्वासित पाणी पुरवठा | १० | | | | | | | | | |
| | १) मोठ्या प्रकल्पांचे जलाशय (७५%) | | ६.५० | १३.०० | १९.५० | ३१३.५० | ६६९.७५ | ४४१.७५ | २.०४ | ८.७१ | ८.६१ |
| | २) मध्यम प्रकल्पांचे जलाशय, मोठ्या व मध्यम प्रकल्पांचे कालवे, साठवण तलाव (२५%) | | ५.०० | १०.०० | १५.०० | १०४.५० | २२३.२५ | १४७.२५ | ०.५२ | २.२३ | २.२१ |
| २ | वहन व्ययासह नियंत्रित पाणी पुरवठा | | ५.०० | १०.०० | १५.०० | ७३२.६० | १५६५.१० | १०३२.३० | ३.६६ | १५.६५ | १५.४८ |
| ३ | अंशा:त आश्वासित पाणी पुरवठा | | २.५० | ५.०० | ७.५० | १४३.०० | ३०५.५० | २०१.५० | ०.३६ | १.५३ | १.५१ |
| ४ | पाणी वापरकर्त्या गटाने स्वखर्चाने बांधलेला व स्वखर्चाने व्यवस्थापन होत असलेले धरण / बंधारा | | ०.८० | १.६० | २.४० | १२.९८ | २७.७३ | १८.२९ | ०.०१ | ०.०४ | ०.०४ |
| | | | | | | | | | **६.५९** | **२८.१६** | **२७.८६** |
| **एकुण अपेक्षित पाणीपट्टी** | | | | | | | | | **६२.६२** | | |

**तक्ता क्र.११ + तक्ता क्र.१२ = रु. २६१.७१ कोटी +रु. ६२.६२ कोटी = रु. ३२४.३३ कोटी रक्कम वसुल होईल.** जी तक्ता ८ मध्ये दर्शविल्या प्रमाणे अपेक्षित महसुल रू.३१६.७४ कोटी आहे.

**प्रोत्साहने / दंडात्मक तरतुदीं :- (कृषी** पाणी वापर)

(१) मूळ दर हा शासकीय उपसा सिंचन योजना (उसिंयो) यांसाठीचा खर्च (विद्युत आकार, उसिंयोंच्या शीर्ष कामाचा देखभाल/ दुरुस्ती व परिचालन खर्च) वगळून १९% प्रचालन व परिरक्षण खर्चावर आधारित असेल आणि तो प्रवाही सिंचनासाठीच्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम २००५ अंतर्गत नोंदणीकृत पाणी वापर संस्थांना लागू असेल.

(२) रबी हंगामासाठीचा घनमापन दर हा प्रवाही सिंचनासाठीचा मूळ दर असेल. खरीप हंगामासाठी तो मूळ दराच्या ५०% व उन्हाळी हंगामासाठी तो १५०% लागू असेल.

(३) जलप्रशुल्क आकारण्याच्या उद्देशाने कोकण व विदर्भ विभागासाठी आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी खरीप, रबी, उन्हाळी हंगामाचा कालावधी निकषांनुसार असेल.

(४) राज्यातील शासकीय उसिंयोंखालील क्षेत्रासाठी प्रवाही सिंचनासाठीचा मूळ दर अधिक उसिंयोसाठीचा खर्च विद्युत आकार, उसिंयोंच्या शीर्ष कामाचा देखभाल दुरुस्ती व परिचालन खर्च यावर आधारित असेल ( उर्वरित ८१ % असा खर्च वरील तक्ता ७ मध्ये नमूद केल्या नुसार इतर प्रवर्गाच्या वापरकर्त्यांमध्ये विभागण्यात येईल ). शासकीय उसिंयोंसाठीचे योजना-निहाय जलप्रशुल्क संबंधित नदी-खोरे अभिकरण मागील जलप्रशुल्क आदेशामध्ये दिलेल्या पद्धतीनुसार निश्चित केले जातील.

(५) लाभक्षेत्रातील तसेच कालव्यापासून किंवा साठवण तलावाच्या पूर्ण संचय पातळी (FRL) पासून महाराष्ट्र भूजल ( विकास व व्यवस्थापन ) अधिनियम , २००९ मधील कलम २६ मध्ये नमूद केलेल्या तरतुदींनुसार प्रभाव क्षेत्रातील विहिरींवरील नगदी पिकांसाठी ( उदा. ऊस , कापूस , केळी व फळबागा इ.) अनुज्ञेय दराच्या ५०% दर लागू असेल.

(६) पाणी वापर संस्था स्थापनेस प्रोत्साहन देण्यासाठी, वैयक्तिक शेतकऱ्यांना प्रवाही सिंचनाचा दर हा मूळ दराच्या १२५% दर लागू असेल.

(७) खाजगी उसियों अंतर्गत नोंदणीकृत पाणी वापर संस्थांना उपरोक्त दरात २५% सवलत देण्यात येईल.

(८) खाजगी उसिंयोंच्या लाभार्थ्यांनी स्वखर्चाने स्त्रोतांच्या जागी बंदिस्त वितरण नलिकेवर जलमापक यंत्र बसवावीत. संक्रमण कालावधीत जलमापक यंत्र बसवेपर्यंत खाजगी/वैयक्तिक उपसासिंचन धारकाची आकारणी पंपाच्या विसर्गाच्या आधारे किंवा प्रमाणित ड्युटीद्वारे करावी. मात्र ही सवलत या आदेशाच्या दिनांकापासून केवळ १ वर्षासाठी अनुज्ञेय राहील. यानंतर प्रवाही सिंचनासाठी अनुज्ञेय दराच्या २ पट दराने आकारणी करावी.

(९) खाजगी उसिंयो यांनी जलमापक यंत्र न बसवल्यास / जलमापक यंत्र बंद पडल्यास / जलमापक यंत्र मध्ये फेरफार केल्याचे निदर्शनास आल्यास प्रत्यक्ष सिंचन क्षेत्र व प्रमाणित ड्युटीवर आधारित पाण्याचे परिमाण परिगणित करून प्रवाही जलप्रशुल्काच्या अनुज्ञेय दराच्या २.० पट दराने आकारणी केली जाईल.

(१०) शासन निर्णय दि. ०२/०५/२०१७ अनुसार, ठोक पाणी पुरवठा गटाने विकेंद्रीत पाणीसाठया पर्यत पाणी उपलब्ध करुन दिल्यास, संबंधित वहन व्यवस्थेच्या म्हणजेच प्रवाही किंवा उपसा अनुरुप वरील परिच्छेद १०.१ च्या उप-परिच्छेद (१), (४) आणि (६) मध्ये नमूद केल्यानुसार जलप्रशुल्क लागू राहील. नैसर्गिक प्रवाहाद्वारे विकेंद्रित साठ्यापर्यंत नियमित पाणी पुरवठा केल्यास १०% वहन व्यय आकारले जाईल. मात्र जर लाभार्थ्यांने कालव्याव्दारे बंदिस्त नलिकेद्वारे विकेंद्रित साठ्यापर्यंत पाणी घेतल्यास, वहन व्यय आकारला जाणार नाही.

(११) मत्स्यशेतीकरिता सिचंनासाठीचे घनमापन दर अनुज्ञेय राहतील.

(१२) ज्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना लाभक्षेत्रात पर्यायी जमिनी दिलेल्या आहेत त्यांना अनुज्ञेय दराच्या ७५% दराने आकारणी करण्यात यावी. तसेच, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी स्वखर्चाने उपसा सिंचन राबवल्यास अनुज्ञेय दराच्या ५०% दराने आकारणी करावी.

(१३) खरीप पिक लांबल्यामुळे रबीमध्ये पाणी घेतले अथवा रबी पिकासाठी उन्हाळी हंगामात पाणी घेतले तर लांबलेल्या सिंचनाच्या आवर्तनासाठी तत्सम खरीप / रबी दराने आकारणी करावी.

(१४) प्रकल्पावरील प्रथम वर्षाच्या सिंचनासाठी (चाचणी सिंचन) जलप्रशुल्काची आकारणी करू नये.

(१५) वैयक्तिक शेतकऱ्यांनी आधुनिक पध्दतीचा (सूक्ष्म सिंचन) अवलंब करून जलमापक यंत्र द्वारे घनमापन पद्धतीने पाणी घेतले तर त्यांना अनुज्ञेय दराच्या ७५ % दराने आकारणी करावी. नोंदणीकृत पाणी वापर संस्थांनी घनमापन पद्धतीने पाणी मोजून घेऊन सुक्ष्म सिंचन केल्यास

नोंदणीकृत पाणी वापर संस्थेसाठी प्रवाही सिंचनासाठी अनुज्ञेय केलेल्या दराच्या ७५% दराने आकारणी करावी.

(१६) हंगाम सुरु होण्यापूर्वी त्या हंगामाच्या जलप्रशुल्काची पूर्ण आगाऊ अदायगी केली असेल तर त्या हंगामासाठी अनुज्ञेय दरामध्ये १० % सवलत दिली जाईल.

(१७) माजी मालगुजारी तलावांच्या पाणीवापराचे दर सर्वोच्च न्यायालयाच्या केस क्र. सिव्हील अपील क्र. २४७५ (१९६८) दि. १६/०८/१९७८ च्या निर्णया नुसार राहतील.

(१८) अनुज्ञेय कालावधी नंतर केलेल्या विलंबित अदायगी करिता वार्षिक १०% दराने दंडात्मक व्याज आकारावे.

(१९) जलसंपदा विभागाची पूर्वपरवानगी न घेता सिंचनासाठी उपलब्ध करून दिलेल्या पाण्याचा औद्योगीक वापर होत असल्याचे निदर्शनास आल्यास औद्योगीक वापरासाठी लागू असलेल्या दराच्या २.० पट दराने आकारणी करावी.

**५.० घरगुती पाणी वापराचा जल प्रशुल्क दर:-**

सन २०२०-२१ ते २०२२-२३ या कालावधी मधील अपेक्षित घरगुती पाणी वापर तक्ता क्र.७ परिच्छेद ३.७० नुसार ६७६०.०० दलघमी असून, तक्ता क्र.७ नुसार अपेक्षित पाणीपट्टी रक्कम रु.४२२ कोटी इतकी आहे. त्यानुसार घरगुती पाणी वापराचा सरासरी दर रु.०.६२ /घमी ( ६२ पैसे प्रती १००० लिटर ) इतका प्रस्तावित आहे. नियोजित कालावधीसाठी ठोक जलप्रशुल्क निर्धारणाचे निकषांमध्ये स्त्रोताच्या विश्वासार्हतेनुसार जलप्रशुल्काचे निकष दिले आहेत. त्यानुसार मूळ दर काढण्याकरिता अंदाजित महसूल परिगणित करताना स्त्रोतनिहाय पाणीवापर ठरविणे आवश्यक आहे.

सन २०२० ते २०२३ या कालवधीमध्ये स्त्रोतनिहाय घरगुती पाणीवापराची सरासरी टक्केवारी शासनाने प्रस्तावित केल्या नुसार गृहीत धरून अपेक्षीत पाणी वापर परिमाण खालील तक्ता -१३ नुसार प्रस्तावित आहे.

<u>तक्ता १३</u>

## सन २०२० ते २०२३ या कालवधीमधील स्त्रोत निहाय अपेक्षित पाणीवापर परिमाण (दलघमी)

| अ. क्र. | स्त्रोत | अपेक्षित पाणी वापर | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण घरगुती पाणी वापराशी % | | | | परिमाण (दलघमी) | | | |
| | | ग्रापं | नपा | मनपा | | ग्रापं | नपा | मनपा | |
| | | | | घ | वा | | | घरगुती | वाणिज्यिक |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | आश्वासित पाणी पुरवठा | १४.१५ | ७.५९ | ३९.४४ | २.३९ | ९५६.५४ | ५१३.०८ | २६६६.१४ | १६१.५६ |
| २ | वहन व्ययासह नियंत्रित पाणी पुरवठा | ८.९५ | ३.७४ | १२.५० | ०.८९ | ६०५.०२ | २५२.८२ | ८४५.०० | ६०.१६ |
| ३ | अंशतः आश्वासित पाणी पुरवठा | ३.२९ | ०.४० | १.१५ | ०.०३ | २२२.४० | २७.०४ | ७७.७४ | २.०३ |
| ४ | पाणी वापरकर्त्या गटाने प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलेला असेल. तसेच पाणी वापरकर्त्या गटाने पायाभूत सुविधा निर्माण केली आणि त्याची देखभाल केली. | ०.२० | ०.०८ | ४.७१ | ०.४७ | १४.२० | ५.४१ | ३१९.०७ | ३१.७९ |
| | | **२६.३०** | **११.८१** | **५७.८१** | **३.७८** | **१७९८.१६** | **७९८.३५** | **३९०७.९५** | **२५५.५४** |
| | **एकूण पाणीवापराची टक्केवारी १०० %** | | | | | **एकूण अंदाजित पाणीवापर (६७६०.०० दलघमी)** | | | |

वरीलप्रमाणे पाणीवापर गृहीत धरून तक्ता ७ मधील घरगुती प्रवर्गाच्या अपेक्षित रु. ४२२ कोटी प्रचालन व परिरक्षण खर्चाची वसुली होण्यासाठी केलेल्या आकडेमोडीवरून खालील तक्ता १४ नुसार स्त्रोतनिहाय ग्रामपंचायत , नगरपालिका / नगरपरिषदा , महानगरपालिका या उपप्रवर्गासाठी प्रतिएकक पाणीवापराचे दर प्रस्तावित करण्यात येत आहेत. मनपा च्या वाणिज्य (व्यापारी) पाणीवापरासह तीनही उपप्रवर्गाचे वापराचे परिमाण शासनाने पाठबंधारे महामंडळाकडून प्राप्त आकडेवारीनुसार प्रस्तावित केले आहेत . वाणिज्य वापराचे दर निकषानुसार घरगुती वापराच्या ५ पट प्रस्तावित करण्यात येत आहेत.

## तक्ता १४

सन २०२०-२१ या कालवधी मध्ये ग्रामपंचायती, नागरी स्थानिक संस्था व महानगरपालीका यांसाठी प्रस्तावित जल प्रशुल्क दर

| अ.क्र. | स्त्रोत | अपेक्षित रू./ घमी | प्रस्तावित दर रू/ घमी ( रुपये प्रती १००० लिटर) | | | | अपेक्षित पाणी वापर | | | | | | | | अपेक्षित पाणीपट्टी वसुली (रू.कोटी) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | परिमाण (दलघमी) | | | | एकूण घरगुती पाणी वापराशी % | | | | | | | |
| | | | ग्रा.पं | नपं | मनपा | | ग्रा.पं | नपं | मनपा | | ग्रा.पं | नपं | मनपा | | ग्रा.पं | नपं | मनपा | |
| | | | | | घ | वा | | | घ | वा | | | घ | वा | | | घ | वा |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ |
| १ | आश्वासित पाणी पुरवठा | ०.६२ | ०.३० | ०.३५ | ०.५५ | २.७० | ९५६.५४ | ५१३.०८ | २६६६.१४ | १६१.५६ | १४.१५ | ७.५९ | ३९.४४ | २.३९ | २८.२२ | १७.८६ | १४५.३० | ४४.०३ |
| २ | वहन व्ययासह नियंत्रित पाणी पुरवठा | | ०.६० | ०.७० | १.१० | ५.५० | ६०५.०२ | २५२.८२ | ८४५.०० | ६०.१६ | ८.९५ | ३.७४ | १२.५० | ०.८९ | ३५.७० | १७.६० | ९२.११ | ३२.७९ |
| ३ | अंशतः आश्वासित पाणी पुरवठा | | ०.१६ | ०.१७ | ०.२७ | १.३६ | २२२.४० | २७.०४ | ७७.७४ | २.०३ | ३.२९ | ०.४० | १.१५ | ०.०३ | ३.५० | ०.४७ | २.१२ | ०.२८ |
| ४ | पाणी वापरकर्त्या गटाने प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलेला असेल. तसेच पाणी वापरकर्त्या गटाने पायाभूत सुविधा निर्माण केली आणि त्याची देखभाल केली.पाणी परवठा | | ०.०५ | ०.०६ | ०.०९ | ०.४४ | १४.२० | ५.४१ | ३१९.०७ | ३१.७९ | ०.२० | ०.०८ | ४.७१ | ०.४७ | ०.०७ | ०.०३ | २.७८ | १.३९ |
| | **एकूण** | | | | | | १७९८.२० | ७९८.३५ | ३९०७.९५ | २५५.५४ | २६.६० | ११.८१ | ५७.८१ | ३.७८ | ६७.४८ | ३५.९५ | २४२.३१ | ७८.४७ |
| | | | | | | | | | | | | | | **एकुण घरगुती पाणीपट्टी** | **४२४.२२** | | | |

वरील तक्त्यातील स्तंभ ४,५,६ व ७ मध्ये प्रस्तावित केलेले दर अंमलात आल्यास स्तंभ क्र. १६,१७,१८ व १९ नुसार रू.४२४.२२ कोटी रक्कम वसुल होईल. जी तक्ता ७ मध्ये दर्शविल्या प्रमाणे अपेक्षित घरगुती महसुल रू.४२२ कोटी आहे.

टिप: १) पायाभूत सुविधांचा पूर्ण/प्रमाणशीर खर्च उचलण्याबाबत किंवा नविन प्रकल्पाच्या नियोजनाच्या टप्प्यात पायाभूत सुविधांचा खर्च उचलण्याबाबत सहमती झाल्यानुसार किंवा पाणी वापर गटाने धरणाच्या खालील बाजूस पाणी उचलण्यासाठी त्यांच्या वार्षिक मागणीइतका क्षमतेचा बंधारा / बांध बांधला असल्यास, ठोक जलप्रशुल्क निर्धारणाचे निकषांनुसार अदा केलेल्या खर्चाच्या प्रमाणात जलप्रशुल्क अनुज्ञेय दराच्या १६% लागू असेल. अशा पाणी वापर गटाने पाणी वाटपाच्या प्रमाणशीर खर्चापैकी दिलेली कोणतीही रक्कम ही आगाऊ जलप्रशुल्क समजण्यात येईल आणि ते अनुज्ञेय दराच्या १६% सवलतीच्या जलप्रशुल्काच्या तुलनेत समायोजित केले जातील. सवलतीचे दर किती वर्षांसाठी लागू असेल याची गणना निकषांमध्ये दिलेल्या पद्धतीने काढण्यात येईल. आगाऊ प्रशुल्काचे पूर्ण समायोजन केल्यावर संबंधित अनुज्ञेय पूर्ण दर लागू होतील. २) वाणिज्य वापरासाठीचे दर निकषानुसार घरगुतीवापराच्या ५ पट प्रस्तावित आहेत. ३) ग्रामपंचायत , नगरपालिका / नगरपरिषदा , महानगरपालिकाचे दर निकषानुसार मूळ दराच्या ७५ % , ९० % आणि १२५ % आहेत.

**प्रोत्साहने / दंडात्मक तरतुदीं :- घरगुती पाणी वापर**

(१) मूळ घनमापन दर हा सर्व हंगामासाठी एकच असेल, व तो पुरवठाच्या स्रोताशी निगडित असेल.

(२) अनुज्ञेय दर महानगरपालिकांना मूळ दराच्या १२५%, इतर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मूळ दराच्या ९०% आणि ग्रामपंचायतींना मूळ दराच्या ७५% असेल.

(३) महानगरपालिकांसोबत अस्तित्वातील कराननाम्यानुसार वार्षिक मागणी मंजूर करतेवेळी व्यापारी वापराचे स्वतंत्रपणे परिमाण निश्चित केले जाईल आणि त्याला योग्य व्यापारी दर म्हणजेच महानगरपालिकेच्या अनुज्ञेय दराच्या पाच पट दर आकारला जाईल.

(४) राज्य शासनाच्या प्रचलित धोरणानुसार खाजगी व अन्य विकासकांनी विकसित केलेल्या खाजगी नागरी वसाहती (Townships) यांना ठोक पाणीपुरवठा गटाने पुरविलेल्या पाण्यास त्या ज्या क्षेत्रात असतील त्या संबंधित नागरी स्थानिक संस्थां अथवा ग्राम पंचायतीच्या अनुज्ञेय दराच्या पाच पट दर आकारला जाईल.

(५) व्यापारी संस्था /खाजगी वसाहती / नागरी वसाहती (Townships) साठी जलप्रशुल्क चालू असे पर्यंत वापरलेल्या पाण्याकरिता व्यापारी_**दराने** जलप्रशुल्क आकारण्यात येईल व बांधकाम पूर्ण झाल्यावर (वापर परवाना O.C.मिळालेनंतर) होणाऱ्या पाणीवापरासाठी संबंधित नागरी स्थानिक संस्थां अथवा ग्राम पंचायतीच्या अनुज्ञेय दराच्या पाच पट दर आकारला जाईल. दोन्ही वापर एकाच वेळी चालू असल्यास त्यासाठी वेगवेगळे जलमापक यंत्र बसवावेत व त्यानुसार आकारणी करावी

(६) लाभक्षेत्रातील तसेच कालव्यापासून किंवा साठवण तलावाच्या पूर्ण संचय पातळी (FRL) पासून महाराष्ट्र भूजल ( विकास व व्यवस्थापन ) अधिनियम , २००९ मधील कलम २६ मध्ये नमूद केलेल्या तरतुदींनुसार प्रभाव क्षेत्रातील विहीरींवर ठोक पाणीवापरकर्ता गट अवलंबून असेल, तर त्यांना जलप्रशुल्क अनुज्ञेय दराच्या ५०% दर लागू असेल.

(७) मंजूर पाणी कोट्याच्या १००% पर्यंत वार्षिक पाणी वापराकरिता अनुज्ञेय दर आकारण्यात यावा. १००%ते १२५% पाणी वापराकरिता अनुज्ञेय दराच्या १.५० पट दर आणि १२५% पेक्षा जास्त वापरास अनुज्ञेय दराच्या ३.० पट दर असतील.

(८) "प्रदूषण करणाऱ्याने किंमत चुकवावी" या तत्वानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी सांडपाणी नैसर्गिक प्रवाहामध्ये अथवा कालव्यात सोडण्यापूर्वी त्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रमाणित

मानकांनुसार प्रक्रिया करणे गरजेचे आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या पाणी वाटपाच्या आधारावर सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) स्थापित केलेला नसल्यास आणि/ अथवा तो पूर्ण क्षमतेने कार्यरत नसल्यास मंजूर पाणी कोटा अथवा प्रत्यक्ष पाणी वापर यापैकी जे अधिक असेल त्यास अनुज्ञेय दराच्या २.० पट दराने आकारणी केली जाईल.

(९) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रक्रिया केलेले सांडपाणी वापरण्याचा हक्क आहे. मात्र प्रक्रिया केलेले पाणी पुनर्वापरासाठी बंदिस्त नलिकेद्वारे प्रक्रिया केंद्रावरून (नदी नाल्यामध्ये न सोडता) उचलणे आवश्यक राहील. असे पाणी शेतीसाठी पुरविल्यास या साठीचा दर नैसर्गिक पाण्याच्या सिंचनासाठी विहित केलेल्या दराच्या ६०% पेक्षा जास्त नसावा. तसेच अशा पाणी वापराचा तपशील ठोक पाणीपुरवठा गटास सादर करावा. प्रक्रिया केलेले पाणी नैसर्गिक प्रवाहात सोडल्यास त्यावर ठोक पाणी पुरवठा गटाचे नियंत्रण असेल.

(१०) करारनामा न करता पाणी वापरल्यास अनुज्ञेय दराच्या २.० पट दराने आकारणी करावी.

(११) ठोक पाणीपुरवठा गटाची पूर्वपरवानगी न घेता नागरी स्थानिक स्वराज्य संस्था पिण्याच्या पाण्याचे पाणीहक्कातून औद्योगिक वापरकर्त्यास पाणी पुरवठा करत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा पाणी वापरासाठी अनुज्ञेय औद्योगिक दराच्या ३.० पट दराने पूर्वलक्षी प्रभावाने आकारणी करावी.

(१२) मीटर चालू नसल्यास / काढून ठेवले असल्यास / छेडछाड केली असल्यास / चुकीचे रिडींग दाखवत असलयाचे आढळून आल्यास मीटर दुरुस्त करण्यासाठी आणि चालू करण्यासाठी एक महिन्याची नोटीस दिली जाईल. या कालावधीतील मंजूर पाणी आरक्षण अथवा प्रत्यक्ष वापर यापैकी जे जादा असेल त्या परिमाणास अनुज्ञेय दराच्या १.५ दराने आकारणी करावी. विशिष्ट स्थानिक परिस्थिती विचारात घेवून मीटर दुरुस्ती कालावधीस एक महिन्याची मुदत वाढ देता येईल. हा दोष ९० दिवसामध्ये दुरुस्त न केल्यास अनुज्ञेय दराच्या २ पट दराने आकारणी करावी.

(१३) अनुज्ञेय कालावधी नंतर केलेल्या विलंबित अदायगी करिता वार्षिक १०% दराने दंडात्मक व्याज आकारावे.

## ६.०० औद्योगिक पाणीवापराचा जल प्रशुल्क दर:-

सन २०२० ते  २०२३ या कालावधी मधील अपेक्षित औद्योगिक पाणी वापर परिच्छेद ३.७० नुसार ८४७.०० दलघमी असून, त्यानुषंगाने तक्ता क्र.७ नुसार अपेक्षित पाणीपट्टी रक्कम रु.११३३.०० कोटी इतकी आहे. त्यानुसार औद्योगिक पाणी वापराचा सरासरी मुळ दर रु.१३.३७/ घमी ( रु १३.३७ प्रती १००० लिटर ) इतका प्रस्तावित आहे. नियोजित कालावधीसाठी ठोक जलप्रशुल्क निर्धारणाचे निकषांमध्ये स्त्रोताच्या विश्वासार्हतेनुसार जलप्रशुल्काचे निकष दिले आहेत. त्यानुसार मूळ दर काढण्याकरिता अंदाजित महसूल परिगणित करताना स्त्रोतनिहाय पाणीवापर ठरविणे आवश्यक आहे.

सन २०२० ते २०२३ या कालावधी मध्ये स्त्रोतनिहाय औद्योगिक पाणीवापराची सरासरी टक्केवारी शासनाने प्रस्तावित केल्या नुसार गृहीत धरून अपेक्षित पाणीवापर खालील तक्ता १५ नुसार प्रस्तावित आहे.

**तक्ता — १५**

सन २०२० ते २०२३ या कालावधी मध्ये औद्योगिक पाणी वापरासाठी स्त्रोतनिहाय अपेक्षित पाणीवापर

| अ.क्र. | स्त्रोत | एकूण औद्योगिक वापराशी % | | | अपेक्षित पाणीवापर दलघमी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रक्रिये करीता पाणी वापर | कच्चा माल म्हणून पाणी वापर | औद्योगिक घटकांतील घरगुती पाणी वापर | प्रक्रिये करीता पाणी वापर | कच्च माल म्हणून पाणी वापर | औद्योगिक घटकांतील घरगुती पाणी वापर |
| १ | आश्वासित पाणी पुरवठा | ५१.०८ | ०.९७ | ७.२८ | ४३२.६५ | ८.२२ | ६१.६६ |
| २ | वहन व्ययासह नियंत्रित पाणी पुरवठा | २४.५२ | ०.३३ | ७.२२ | २०७.६८ | २.८० | ६१.१५ |
| ३ | अंशतः आश्वासित पाणी पुरवठा | २.२६ | ०.०३ | ०.१७ | १९.१४ | ०.२५ | १.४४ |
| ४ | पाणी वापरकर्त्या गटाने प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलेला असेल | ४.७७ | ०.०० | १.३८ | ४०.४० | ०.०० | ११.६*९ |
| | | **८२.६३** | **१.३३** | **१६.०४** | **६९९.८८** | **११.२७** | **१३५.९४** |
| | एकूण अपेक्षित औद्योगिक पाणीवापर (८४७.००दलघमी) | | | | ८४७.०० | | |

वरीलप्रमाणे पाणीवापर गृहीत धरून तक्ता ७ मधील अपेक्षित रु. ११३३ कोटी प्रचालन व परिरक्षण खर्चाची वसुली होण्यासाठी केलेल्या आकडेमोडीवरून खालील तक्ता १६ नुसार स्त्रोतनिहाय प्रक्रिया व कच्चामाल या उद्योगाकरिता प्रतिएकक पाणीवापराचे दर प्रस्तावित करण्यात येत आहेत. त्यामध्ये उद्योगांसाठी घरगुती वापर पाटबंधारे विकास महामंडळाच्या मंजुरीनुसार शासनाचे प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे गृहीत धरला आहे. या घरगुती वापरास घरगुती प्रवर्गातील महानगरपालिकेचे प्रास्तवित दर घेण्यात आले आहेत व ते तक्ता १४ मध्ये दिल्यानुसार आहेत.सन २०२०  ते २०२३ या कालावधी साठीचे स्त्रोतनिहाय औद्योगिक पाणीवापराचे दर खालील तक्ता १६ नुसार प्रस्तावित  आहेत.

## तक्ता १६

## सन २०२० - २१ कालावधीसाठी स्त्रोतनिहाय औद्योगिक पाणीवापराचे प्रस्तावित दर (रु./घमी) ( रुपये प्रती १००० लिटर )

| अ. क्र. | स्त्रोत | सरासरी दर (रु./घमी) | प्रस्तावित दर (रू./ घमी) ( रुपये प्रती १००० लिटर ) | | | अपेक्षित पाणी वापर | | | | | | अपेक्षित पाणीपट्टी रक्कम (रू. कोटी) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | परिमाण (दलघमी) | | | एकूण औद्योगिक पाणी वापराशी % | | | | | |
| | | | प्रक्रिये करीता | कच्चा माल | औद्योगिक घटकांतील घरगुती पाणी वापर * | प्रक्रिये करीता | कच्चा माल | औद्योगिक घटकांतील घरगुती पाणी वापर | प्रक्रिये करीता | कच्चा माल | घरगुती | प्रक्रिये करीता<br>४X७ | कच्चा माल<br>५X८ | घरगुती<br>६X९ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| १ | आश्वासित पाणी पुरवठा | १३.३७ | ९.३० | २३२.५० | ०.५५ | ४३२.६५ | ८.२२ | ६१.६६ | ५१.०८ | ०.९७ | ७.२८ | ४०२.३६ | १९१.०२ | ३.३६ |
| २ | वहन व्ययासह नियंत्रित पाणी पुरवठा | | १८.६० | ४६५.०० | १.१० | २०७.६८ | २.८० | ६१.१५ | २४.५२ | ०.३३ | ७.२२ | ३८६.२९ | १२९.९७ | ६.६७ |
| ३ | अंशतः आश्वासित पाणी पुरवठा | | ४.६५ | ११६.२५ | ०.२७ | १९.१४ | ०.२५ | १.४४ | २.२६ | ०.०३ | ०.१७ | ८.९० | २.९५ | ०.०४ |
| ४ | पाणी वापरकर्त्या गटाने प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलेला असेल | | १.४९ | ३७.२० | ०.०९ | ४०.४० | ०.० | ११.६९ | ४.७७ | ०.०० | १.३८ | ६.०१ | ०.०१ | ०.१० |
| | **एकूण** | | | | | ६९१.८८ | ११.२७ | १३५.९४ | ८२.६३ | १.३३ | १६.०४ | ८०३.५७ | ३२३.९६ | १०.१७ |
| | | | | | | | | | | | **एकुण औद्योगिक पाणीपट्टी** | **११३७.७०** | | |

वरिल तक्त्यातील स्तंभ ४,५ व ६ मध्ये प्रस्तावित केलेले दर अंमलात आल्यास स्तंभ क्र. १३, १४ व १५ नुसार रु.११३७.७० कोटी रक्कम वसुल होईल जी तक्ता ७ मध्ये दर्शविल्या प्रमाण अपेक्षित औद्योगिक महसुल रू.११३३.०० कोटी आहे.

टिप:

१) पायाभूत सुविधांचा पूर्ण/प्रमाणशीर खर्च उचलण्याबाबत किंवा नविन प्रकल्पाच्या नियोजनाच्या टप्प्यात पायाभूत सुविधांचा खर्च उचलण्याबाबत सहमती झाल्यानुसार किंवा पाणी वापर गटाने धरणाच्या खालील बाजूस पाणी उचलण्यासाठी त्यांच्या वार्षिक मागणीइतका क्षमतेचा बंधारा / बांध बांधला असल्यास, ठोक जलप्रशुल्क निर्धारणाचे निकषांनुसार अदा केलेल्या खर्चाच्या प्रमाणात जलप्रशुल्क अनुज्ञेय दराच्या १६% लागू असेल. अशा पाणी वापर गटाने पाणी वाटपाच्या प्रमाणशीर खर्चापैकी दिलेली कोणतीही रक्कम ही आगाऊ जलप्रशुल्क समजण्यात येईल आणि ते अनुज्ञेय दराच्या १६% सवलतीच्या जलप्रशुल्काच्या तुलनेत समायोजित केले जातील. सवलतीचे दर किती वर्षांसाठी लागू असेल याची गणना निकषांमध्ये दिलेल्या पद्धतीने काढण्यात येईल. आगाऊ प्रशुल्काचे पूर्ण समायोजन केल्यावर संबंधित अनुज्ञेय पूर्ण दर लागू होतील. २ ) ' कच्चा माल ' उद्योगांचे दर प्रक्रिया उद्योगांच्या दराच्या २५ पट प्रस्तावित आहेत.

**प्रोत्साहने / दंडात्मक तरतुदीं :- औद्योगिक पाणी वापर**

(१) मूळ घनमापन दर हा सर्व हंगामासाठी एकच असेल, व तो पुरवठाच्या स्त्रोताशी निगडित असेल.

(२) मूळ दर (BR) हे स्त्रोतनिहाय खालिलप्रमाणे वर्गीकरणावर आधारित असतील आणि त्याबरोबरच नैसर्गिक प्रवाहात अथवा कालव्यात सोडण्यापुर्वी सांडपाण्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या विहीत गुणवत्ते साठी शुध्दिकरण प्रक्रिया करण्याच्या अटीच्या आधीन राहील.

(३) मूळ दर हा प्रक्रिया उद्योग, औष्णिक केंद्राप्रमाणे शीतकरण प्रक्रियेसाठी वापर करणारे उद्योग आणि वस्तुनिर्माण उद्योग यांना लागू असेल. पाण्याचा कच्चा माल म्हणून वापरणारे उद्योग जसे बाटलीबंद पाणी, शीतपेये, इथेनॉल व मद्य निर्मिती उद्योग, उस प्रक्रिया उद्योगातील सहउर्जानिर्मीती आणि इतर तत्सम उद्योग यांना अनुज्ञेय दराच्या २५ पट दर लागू असेल.

(४) उद्योगांसोबत करारनामा करतेवेळी घरगुती पाणीवापर याचे स्वतंत्रपणे परिमाण निश्चित केले जाईल आणि त्याला सदर उद्योग ज्या क्षेत्रात असेल त्या संबंधित नागरी स्थानिक संस्थां अथवा ग्राम पंचायतीच्या अनुज्ञेय दर आकारला जाईल. पाणी ठोक पाणी पुरवठा गटाने सदर वापर मंजूर करावा आणि आवश्यकतेनुसार मीटर सह पायाभूत सुविधा इत्यादी बाबत पूर्तता केल्यानंतर करारात तशी तरतूद करावी.

(५) लाभक्षेत्रातील तसेच कालव्यापासून किंवा साठवण तलावाच्या पूर्ण संचय पातळी (FRL) पासून महाराष्ट्र भूजल ( विकास व व्यवस्थापन ) अधिनियम , २००९ मधील कलम २६ मध्ये नमूद केलेल्या तरतुदींनुसार प्रभाव क्षेत्रातील विहीरींवर ठोक पाणीवापरकर्ता गट अवलंबून असेल, तर त्यांना जलप्रशुल्क अनुज्ञेय दराच्या ५०% दर लागू असेल.

(६) मंजूर पाणी कोट्याच्या १००% पर्यंत वार्षिक पाणी वापराकरिता अनुज्ञेय दर आकारण्यात यावा. १००%ते १२५% पाणी वापराकरिता अनुज्ञेय दराच्या १.५० पट दर आणि १२५% पेक्षा जास्त वापरास अनुज्ञेय दराच्या ३.० पट दर असतील.

(७) कृषी उद्योग जसे कुक्कुटपालन, भात गिरणी, दुग्ध व्यवसाय, मक्यावरील प्रक्रिया, वनस्पती तुप इ. साठी अनुज्ञेय दराच्या ७५ % दराने आकारणी करावी. मात्र ऊस, मका इत्यादी पासून अल्कोहोल, इथेनॉल निर्मितीसाठी तसेच वायनरी, ब्रुवरीसाठी ही सवलत अनुज्ञेय असणार नाही

(८) "प्रदूषण करणाऱ्याने किंमत चुकवावी" तत्व - उद्योगांनी सांडपाणी नैसर्गिक प्रवाहामध्ये अथवा कालव्यात सोडण्यापूर्वी त्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रमाणित मानकांनुसार प्रक्रिया करणे गरजेचे आहे. उदयोगांनी त्यांच्या पाणी वाटपाच्या आधारावर सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (Effulent Treatment Plant) स्थापित केलेला नसल्यास आणि तो पूर्ण क्षमतेने कार्यरत नसल्यास मंजूर पाणी कोटा अथवा प्रत्यक्ष पाणी वापर यापैकी जे अधिक **असेल त्यास** अनुज्ञेय दराच्या २.० पट दराने आकारणी केली जाईल.

(९) एखादा उद्योग पाण्याचा पुनर्वापर करुन पाणी वापर कमी करत असल्यास पुनर्वापराच्या सहृयाने नक्त पाणी मागणी किमान ७५% च्या मर्यादेपर्यंत वा त्यापेक्षा कमी करीत असेल तर अनुज्ञेय दराच्या ७५% दराने आकारणी करावी. तथापि, याबाबतची खातरजमा कार्यकारी अभियंता यांचेपेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याने करणे आवश्यक आहे.

(१०) उद्योगांना प्रक्रिया केलेले सांडपाणी वापरण्याचा आधिकार आहे. मात्र प्रक्रिया केलेले पाणी पुनर्वापरासाठी प्रक्रिया केंद्रावरून बंदिस्त नलिकेद्वारे (नदी नाल्यामध्ये न सोडता) उचलणे आवश्यक राहील. असे पाणी शेतीसाठी पुरविल्यास या साठीचा दर नैसर्गिक पाण्याच्या सिंचनासाठी विहित केलेल्या दराच्या ६०% पेक्षा जास्त नसावा. तसेच अशा पाणी वापराचा तपशील जलसंपदा विभागास सादर करावा.

(११) करारनामा न करता पाणी वापरल्यास अनुज्ञेय दराच्या २.० पट दराने आकारणी करावी.

(१२) उद्योगांनी शून्य द्रव विसर्ग (Zero Liquid Discharge) तंत्रज्ञानाचा अवलंब केला आणि त्यांच्या प्रणाली मधील व्यय, बाष्पीभवन आणि प्रक्रियेतील वापर यासाठी वाटपाच्या २५% पर्यंत पाणीवापर केला तर त्या पाणी वापरास अनुज्ञेय दराच्या फक्त २५% जलप्रशुल्क आकारले जाईल.

(१३) मीटर चालू नसल्यास / काढून ठेवले असल्यास / छेडछाड केली असल्यास / चुकीचे रिडींग दाखवत असलयाचे आढळून आल्यास मीटर दुरुस्त करण्यासाठी आणि चालू करण्यासाठी एक महिन्याची नोटीस दिली जाईल. या कालावधीतील मंजूर पाणी आरक्षण अथवा प्रत्यक्ष वापर यापैकी जे जादा असेल त्या परिमाणास अनुज्ञेय दराच्या १.५ दराने आकारणी करावी. विशिष्ट स्थानिक परिस्थिती विचारात घेवून मीटर दुरुस्ती कालावधीस एक महिन्याची मुदत वाढ देता येईल. हा दोष ९० दिवसामध्ये दुरुस्त न केल्यास अनुज्ञेय दराच्या २ दराने आकारणी करावी.

(१४) अनुज्ञेय कालावधी नंतर केलेल्या विलंबित अदायगी करिता वार्षिक १०% दराने दंडात्मक व्याज आकारावे.

## ७.० हमी शुल्क व दंडनीय आकारणी:

उपलब्ध पाण्याचा इष्टतम वापर व्हावा, आरक्षित पाणी विना वापर राहू नये यासाठी बिगरसिंचन वापरकर्त्यास टप्पा निहाय पाणीवापराच्या नियोजनाची मुभा देण्यात येत आहे. बिगर सिंचन पाणी वापर कर्ता त्यांना मंजूर पाणी वापराचा विनियोग टप्प्या टप्प्यात करणार असल्यास याबाबतचे नियोजन त्यांनी जलसंपदा विभागास करार करणे पूर्वी देण्यात यावे. तशी तरतुद करारात करण्यात यावी. जलप्रशुल्काची आकारणी या टप्पा नियोजनामधील पाणी वापरानुसार करण्यात यावी मात्र उर्वरित पाण्याच्या परिमाणावर (एकूण मंजूर पाणी - टप्पा नियोजनातील पाणी) ५% दराने हमीशुल्काची आकारणी करावी. तसेच प्रत्यक्ष पाणी वापर व टप्पा नियोजनातील पाणी वापर यात १०% पेक्षा जास्त विचलन असल्यास पुढील प्रमाणे आकारणी करावी.

प्रत्यक्ष पाणी वापर टप्पा नियोजनातील पाणी वापराच्या परिमाणाच्या ९०% पेक्षा कमी असल्यास टप्पा नियोजनातील परिमाणाच्या ९०% इतक्या परिमाणावर आकारणी करावी. प्रत्यक्ष वापर हा टप्पा नियोजनातील परिमाणाच्या ९०% ते १००% या मर्यादेत असल्यास अनुज्ञेय दराने आकारणी करावी. मात्र प्रत्यक्ष वापर टप्पा नियोजनातील परिमाणाच्या १००% पेक्षा जास्त असल्यास अशा जास्तीच्या परिमाणावर मानक दराच्या १.५० पट दराने आकारणी करावी. अधिक स्पष्टतेसाठी उदाहरणादाखल आकडेमोड खालील प्रमाणे आहे;

समजा, एका वापरकर्त्याने ५ वर्षांकरिता १०० दलघमी बिगर सिंचन पाणी वापरासाठी जलसंपदा विभागाशी करारनामा केला आहे. त्या वापरकर्त्यास १०० दलघमी पाणी ४ थ्या वर्षापासून लागणार आहे व पहिल्या ३ वर्षातील त्याची गरज अनुक्रमे ५०, ६० व ८० दलघमी आहे. ही टप्पानिहाय पाण्याची गरज करारनाम्यात नमूद केली जाईल.

सदर पाणी वापराची प्रशुल्क आकारणी पुढीलप्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| १. | वर्ष एक | ५० दलघमी X अनुज्ञेय दर + उर्वरित ५० दलघमी वर अनुज्ञेय दराच्या ५% प्रमाणे हमीशुल्क आकार |
| २. | वर्ष दोन | ६० दलघमी X अनुज्ञेय दर + उर्वरित ४० दलघमी वर अनुज्ञेय दराच्या ५% प्रमाणे हमीशुल्क आकार |
| ३. | वर्ष तीन | ८० दलघमी X अनुज्ञेय दर + उर्वरित २० दलघमी वर अनुज्ञेय दराच्या ५% प्रमाणे हमीशुल्क आकार |
| ४. | वर्ष चार व पाच | १०० दलघमी X अनुज्ञेय दर |

**दंडनीय आकारणी-:**

तथापि उपरोक्त टप्पेनिहाय परिमाणानुसार प्रत्यक्ष पाणी वापर झाला नसेल व त्यात १०% पेक्षा जास्त तफावत असेल तर वर नमूद घरगुती / औद्योगिक पाणी वापराच्या प्रवर्गातील दंडात्मक दरांनुसार कार्यवाही करावी.

**८.० नियंत्रण कालावधी २०२०-२३ मधील सन २०२०-२१ साठी अपेक्षित प्रचालन व परिरक्षण खर्च व अपेक्षित पाणीपट्टी यांचा तपशील :-**

अ) प्रचालन व परिरक्षण खर्च = प्रशासकीय खर्च + सिंचन व्यवस्थापन खर्च + परिरक्षण खर्च व परिचालनल खर्च + कार्यान्वयन खर्च+ प्रतिबंधात्मक खर्च

**= रू.११६.०० कोटी + रू.८५०.०० कोटी + रू.५०० कोटी + रू.२५४ कोटी + रू.२०० कोटी**

**= रू.१९२०.०० कोटी**

ब) अपेक्षित पाणीपट्टी आकारणी = (कृषी+घरघुती +औद्योगिक)

**= रु.३२४.३३ कोटी + ४८.२६** (शासकीय उसिंयोचा खर्च) **+ रु.४२४.२२ कोटी + रु.११३७.७० कोटी**

**= रू.१९३४.५१ कोटी**

अंमल बजावणीच्या दृष्टीकोनातुन प्रस्तावित दर हे दि.१ जुलै, २०२० पासून लागू करण्यात यावेत सदरचे दर फक्त २०२०-२१ या एका वर्षाकरिता लागू करावे व सन २०२१-२२ व सन २०२२-२३ करिता सदरील दर महागाई निर्देशांकानुसार वाढविण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच सन २०२० ते २०२३

या कालावधीसाठी सर्व ग्राहकांसाठी औद्योगिक पाणी वापर, घरगुती पाणी वापर व कृषीसाठीचा पाणी वापर संपुर्णत: घनमापन पध्दतीने करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

त्यासाठीचे दर खालीलप्रमाणे परिशिष्ठामध्ये सोबत सादर केले आहे.

परिशिष्ट क्र.१:- कृषीसाठीचा कारणासाठीचा प्रस्तावित दर

परिशिष्ट क्र.२:- घरगुती कारणासाठीचा प्रस्तावित दर

परिशिष्ट क्र.३:- औद्योगिक कारणासाठीचा प्रस्तावित दर

**सोबत: परिशिष्ट १ ते ३**

सही /-

(डॉ . रामनाथ सोनवणे )

सचिव

## परिशिष्ट क्र.१:- कृषीसाठीचा पाणी वापर

## सन २०२० ते २०२३ मधील प्रस्तावित कृषीसाठीचा जल प्रशुल्क दर

### १) प्रवाही सिंचनाकरिता पाण्याचे घनमापन दर (पैसे/घमी) (पैसे प्रती 1000 लिटर )

| अ.क्र. | पाणीपुरवठा प्रकार | प्रस्तावित दर (पै /घमी) ( पैसे प्रती 1000 लिटर ) | | |
|---|---|---|---|---|
| क) | कृषी पाणीपुरवठा | खरिप | रब्बी | उन्हाळी |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | (अ) नोंदणीकृत पाणी वापर संस्था | ५.५० | ११.०० | १६.५० |
| २ | (ब) वैयक्तीक लाभधारक | ७.०० | १४.०० | २१.०० |

### २) उपसा योजनांचे प्रस्तावित जल प्रशुल्क दर (पैसे/घमी)

| अ.क्र. | पाणीपुरवठा प्रकार व स्त्रोत | प्रस्तावित दर (पैसे/घमी) (पैसे प्रती 1000 लिटर ) | | |
|---|---|---|---|---|
| क) | कृषी पाणीपुरवठा | खरिप | रब्बी | उन्हाळी |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | आश्वासित पाणी पुरवठा<br>१) मोठ्या प्रकल्पांचे जलाशय | ६.५० | १३.०० | १९.५० |
| | २) मध्यम प्रकल्पांचे जलाशय, मोठ्या व मध्यम प्रकल्पांचे कालवे, साठवण तलाव | ५.०० | १०.०० | १५.०० |
| २ | वहन व्ययासह नियंत्रित पाणी पुरवठा | ५.०० | १०.०० | १५.०० |
| ३ | अंश:त आश्वासित पाणी पुरवठा | २.५० | ५.०० | ७.५० |
| ४ | पाणी वापरकर्त्या गटाने स्वखर्चाने बांधलेला व स्वखर्चाने व्यवस्थापन होत असलेले धरण / बंधारा | ०.८० | १.६० | २.४० |

## परिशिष्ट क्र.२:- घरगूती कारणासाठीचा पाणी वापर

## सन २०२० ते २०२३ मधील प्रस्तावित घरगूती कारणासाठीचा जल प्रशुल्क दर

| अ.क्र. | स्त्रोत | प्रस्तावित दर रू/ घमी ( रुपये प्रती 1000 लिटर ) | | | |
|---|---|---|---|---|---|
| ब) | घरगूती पाणी वापर | ग्रापं | नपा | मनपा | |
| | | | | घ | वा |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | आश्वासित पाणी पुरवठा | ०.३० | ०.३५ | ०.५५ | २.७० |
| २ | वहन व्ययासह नियंत्रित पाणी पुरवठा | ०.६० | ०.७० | १.१० | ५.५० |
| ३ | अंशतः आश्वासित पाणी पुरवठा | ०.१६ | ०.१७ | ०.२७ | १.३६ |
| ४ | पाणी वापरकर्त्या गटाने प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलेला असेल. तसेच पाणी वापरकर्त्या गटाने पायाभूत सुविधा निर्माण केली | ०.०५ | ०.०६ | ०.०९ | ०.४४ |

टिप: १) पायाभूत सुविधांचा पूर्ण/प्रमाणशीर खर्च उचलण्याबाबत किंवा नविन प्रकल्पाच्या नियोजनाच्या टप्प्यात पायाभूत सुविधांचा खर्च उचलण्याबाबत सहमती झाल्यानुसार किंवा पाणी वापर गटाने धरणाच्या खालील बाजूस पाणी उचलण्यासाठी ठोक जलप्रशुल्क निर्धारणाचे निकषांनुसार बंधारा / बांध बांधला असल्यास, अदा केलेल्या खर्चाच्या प्रमाणात जलप्रशुल्क अनुज्ञेय दराच्या १६% लागू असेल. अशा पाणी वापर गटाने पाणी वाटपाच्या प्रमाणशीर खर्चापैकी दिलेली कोणतीही रक्कम ही आगाऊ जलप्रशुल्क समजण्यात येईल आणि ते अनुज्ञेय दराच्या १६% सवलतीच्या जलप्रशुल्काच्या तुलनेत समायोजित केले जातील. सवलतीचे दर किती वर्षांसाठी लागू असेल याची गणना निकषांमध्ये दिलेल्या पद्धतीने काढण्यात येईल. आगाऊ प्रशुल्काचे पूर्ण समायोजन केल्यावर संबंधित अनुज्ञेय पूर्ण दर लागू होतील. २) वाणिज्य वापरासाठीचे दर निकषानुसार घरगुतीवापराच्या ५ पट प्रस्तावित आहेत. ३) ग्रामपंचायत , नगरपालिका / नगरपरिषदा , महानगरपालिकाचे दर निकषानुसार मूळ दराच्या ७५ % , ९० % आणि १२५ % आहेत.

परिशिष्ट क्र.३:- औद्योगिक कारणासाठीचा पाणी वापर

सन २०२० ते २०२३ मधील प्रस्तावित औद्योगिक कारणासाठीचा जल प्रशुल्क दर

| अ.क्र. | स्रोत | प्रस्तावित दर रू/ घमी ( रुपये प्रती 1000 लिटर ) | | |
|---|---|---|---|---|
| अ) | औद्योगिक पाणी वापर | प्रक्रिया | कच्चा माल | औद्योगिक घटकांतील घरगुती पाणी वापर |
| १ | आश्वासित पाणी पुरवठा | ९.३० | २३२.५० | ०.५५ |
| २ | वहन व्ययासह नियंत्रित पाणी पुरवठा | १८.६० | ४६५.०० | १.१० |
| ३ | अंशतः आश्वासित पाणी पुरवठा | ४.६५ | ११६.२५ | ०.२७ |
| ४ | पाणी वापरकर्त्या गटाने प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलेला असेल | १.४९ | ३७.२० | ०.०९ |

टिप: १) पायाभूत सुविधांचा पूर्ण/प्रमाणशीर खर्च उचलण्याबाबत किंवा नविन प्रकल्पाच्या नियोजनाच्या टप्प्यात पायाभूत सुविधांचा खर्च उचलण्याबाबत सहमती झाल्यानुसार किंवा पाणी वापर गटाने धरणाच्या खालील बाजूस पाणी उचलण्यासाठी ठोक जलप्रशुल्क निर्धारणाचे निकषांनुसार बंधारा / बांध बांधला असल्यास, अदा केलेल्या खर्चाच्या प्रमाणात जलप्रशुल्क अनुज्ञेय दराच्या १६% लागू असेल. अशा पाणी वापर गटाने पाणी वाटपाच्या प्रमाणशीर खर्चापैकी दिलेली कोणतीही रक्कम ही आगाऊ जलप्रशुल्क समजण्यात येईल आणि ते अनुज्ञेय दराच्या १६% सवलतीच्या जलप्रशुल्काच्या तुलनेत समायोजित केले जातील. सवलतीचे दर किती वर्षांसाठी लागू असेल याची गणना निकषांमध्ये दिलेल्या पद्धतीने काढण्यात येईल. आगाऊ प्रशुल्काचे पूर्ण समायोजन केल्यावर संबंधित अनुज्ञेय पूर्ण दर लागू होतील.

२) ' कच्चा माल ' उद्योगांचे दर प्रक्रिया उद्योगांच्या दराच्या २५ पट प्रस्तावित आहेत.